सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार
क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र : ११२/२०२५/धुळे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्रीमती. अल्का आदित्य टाटीया, रा. मु. पो. साई नॉव्हेल्टी, सटाणा रोड, पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे. | तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, साक्री, ता. साक्री, जि. धुळे | जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे,साक्री रोड, गरुड बाग, नवनाथ नगर, धुळे, ता. जि. धुळे-४२४००१ |

## सुनावणी दिनांक १७/०३/२०२६

तक्रारदार यांनी दिनांक १९/०३/२०२५ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १७/०३/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी सर्व पक्षकार उपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक १९/०३/२०२५ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "कोविड केअर सेंटर पिंपळनेर (सामोडे) येथे कोविड-१९ कालावधीत माझ्या साई नॉव्हेल्टी पिंपळनेर या दुकानातुन २८३६३ रुपयाचे साहित्य पुरवण्यात आले होते. त्याबाबत मी सर्व बीले, कोटेशन इत्यादी कागदपत्रांची पुर्तता करूनही अद्याप सदर बील पेड झालेले नाही. तर सदर रक्कम व्याजासह परत मिळावी याबाबतची माहिती मिळावी म्हणुन मी दि. २८/१०/२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मा. जनमाहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी सो. पंचायत समिती साक्री जि. धुळे यांच्याकडे माहितीची मागणी केली होती. परंतु कलम ७ (१) नुसार ३० दिवसांत माहिती मिळणे अपेक्षित असतांना त्यांनी दि. ३/११/२०२४ रोजी पाठवलेल्या दोन पत्रान्वये माझे समाधान न झाल्यामुळे मी दि. २७/१२/२०२४ रोजी कलम १९ (१) नुसार मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी सो. जिल्हा परिषद धुळे यांच्याकडे प्रथम अपिल केले. दि. ०६/०१/२०२५ च्या पत्रानुसार त्यांनी दि. १७/०१/२०२५ रोजी ऑनलाईन सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीला मी ऑनलाईन हजर होते. परंतु सदर सुनावणीला २ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असून अद्याप प्रथम अपिल अधिकाऱ्यांनी आदेश पारित केलेला नाही. म्हणुन मी खुप व्यथीत झाली असून खालील मुद्यांच्या आधारावर आपणांकडे कलम १८ (१) नुसार तक्रार सादर करीत आहे. १) मा. जन माहिती अधिकारी सो. यांनी कलम ७ (१) नुसार ३० दिवसांत माहिती देणे आवश्यक असतांना त्यांनी ती दिली नाही, तरी संपूर्ण माहिती मोफत देण्याचे आदेश व्हावेत ही विनंती. अर्ज दाखल केल्यापासुन ३० दिवसांच्या विहीत मुदतीत माहिती न देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) नुसार दंड व कलम २० (२) नुसार शास्तीची कार्यवाही करावी.२) मा. प्रथम अपिलीय अधिकारी सो. यांनी सुनावणी घेतली परंतु आदेश अथवा निर्णय पारित केलेला नाही. प्रथम अपिल अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या विहीत मुदतीत आदेश पारित न

करणाऱ्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ग) नुसार दंड व कलम २०(२) नुसार शास्तीची कार्यवाही करावी.३) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अन्वये व दप्तर दिरंगाई कायदा २००६ च्या कलम १० नुसार कृपया त्वरीत दोघांवर शिस्तभंगाची कारवाई करावी व त्यांच्या सेवा पुस्तीकेत तशी नोंद करावी ही विनंती.४) माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) नुसार मला झालेल्या आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रासापोटी मला ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे कृपया आदेश व्हावेत ही नम्र विनंती.५) सोबतच माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ चे कलम ७ (२) आणि कलम ७ (८) चे उल्लंघन केले प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय माहिती अधिकारी यांच्यावर भा.दं.सं. १८६० चे कलम १६६ ए (लोकसेवक यांनी बेईमानी पूर्वक कार्यकरणे) कलम १८८ (शासकीय व वैध आदेशांची अवहेलना करणे) नुसार एफ.आय.आर. दाखल करून फौजदारी कारवाई करणे संबंधी शासनाकडे शिफारस करावी."

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २८/१०/२०२४ च्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २०२१ ते आजतागायत या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे."

***"१.कोवीड केअर सेंटर पिंपळनेर (सामोडे) येथे कोवीड-१९ कालावधीत माझ्या साई नॉव्हेल्टी पिंपळनेर या दुकानातून २८३६३ रुपयाचे साहित्य पुरवण्यात आले होते. त्याबाबत मी सर्व बिले, कोटेशन इत्यादी कागदपत्रांची पुर्तता करूनही अद्याप सदर बिल पेड झालेले नाही. तर सदर रक्कम मला व्याजासह परत मिळावे त्याबाबत खालीलप्रमाणे मुद्दे निहाय माहिती मिळावी. १. दि. ३१/०५/२०२२ रोजीच्या खरेदी देयकानुसार शासनाकडून आपणांकडे आलेला (मंजूर झालेला) निधी बाबतच्या पुराव्यांच्या झेरॉक्स प्रती. २) सदर देयकानुसार वाटप निधीच्या पुराव्यांच्या झेरॉक्स प्रती, वाटप न झालेला निधी व शिल्लक निधी बाबतची सविस्तर माहिती मिळावी. ३) निधी उपलब्ध असूनही वाटप न करण्यास जबाबदार अधिकाऱ्याचे नाव, पद, हुदा इत्यादी माहिती मिळावी. ४) दि. ३१/५/२०२२ रोजीच्या, खरेदी देयकानुसार संबंधितांनी आपणांस सादर केलेल्या कोटेशनच्या झेरॉक्स प्रती मिळाव्यात."***

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे कारण नमूद करून तक्रारदार यांनी प्रथम अपिली अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे यांचेकडे दिनांक २७/१२/२०२४ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांच्या दिनांक २८/१०/२०२४ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, साक्री यांनी तक्रारदार यांना दिनांक ०३/११/२०२४ चया पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येते. तसेच, तक्रारदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे यांचेकडे दिनांक २७/१२/२०२४ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १७/०१/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत करून प्रथम अपील अर्ज निकाली काढल्याचे निदर्शनास येते.

*“ सौ. अल्का आदित्य टाटिया, साई नॉव्हेल्टी, सटाणा रोड, पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे यांचेकडील विनंती अर्ज दि. २८/१०/२०२४ च्या अर्जानुसार तालुका आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य पथक, साक्री यांनी आजच्या दिनांकास पुनश्चः अनुदान मागणी पत्र जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे सादर करुन त्याची प्रत सो. टाटिया यांना देण्यात यावी व तालुका आरोग्य अधिकारी, साक्री यांनी अनुदान प्राप्त होताच सो. टाटिया यांचे देयक त्वरित अदा करण्याची कार्यवाही करावी असे आदेश देण्यात येत आहे.”*

प्रथम अपील आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, साक्री यांनी दिनांक २७/०२/२०२५ अन्वये कार्यवाही केल्याचे दिसून येते.मात्र सुनावणीवेळी उपस्थित तक्रारदार यांनी त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती अद्याप प्राप्त झाली नसल्याचे कथन केले आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा **तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, साक्री,जि.धुळे** यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य **अधिकारी,आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, धुळे** यांच्या दिनांक १७/०१/२०२५ अन्वये पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशाची अंमलबजावणी करावी.

२. वरील निर्देशांसह प्रस्तूत **तक्रार क्र. ११२/२०२५/धुळे** निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ४४०६ दि. ०८/०७/२०२५